RNI No. MAHABIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ७१] मंगळवार, ऑगस्ट २५, २०२६/भाद्रपद ३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १०७**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपविभागीय अधिकारी डहाणू ,उपविभाग -डहाणू जिल्हा-पालघर

**मौजे-घोलवड येथील रेल्वे लाईन वरील लेवल क्रासिंग नं. ६१ उड्डाणपुल प्रकल्पासाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ (१) अन्वये**

**घोषणा**

क्रमांक डीपी/भूसं/मौजे-घोलवड उड्डाणपुल/अधिसुचना १९(१)/कावि-११२/२०२६.— ज्याअर्थी, समुचितशासन असलेल्या पालघर जिल्ह्याचा जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे ) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १८/०३/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेच्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, डहाणू व तलासरी तालुक्याचे सक्षम प्राधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुंटूबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसातीच्या प्रयोजनासाठी पुर्नवसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, डहाणू विभाग, डहाणू यास पदनिर्देशित केलेले आहे.

## परिशिष्ट-१

मौजे-घोलवड येथील रेल्वे लाईन वरील लेवल क्रासिंग नं. ६१ अंतर्गत सुरु असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या उर्वरीत जागेचे संपादना करीता प्रस्ताव मौजे-घोलवड, ता. डहाणू, जि. पालघर.

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ (हे.आर/चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | डहाणू | घोलवड | १७८/अ पै, संगणक ७/१२ प्रमाणे १७८/७/१/५ | ०.०१.१२ |
| | | | | १७९/१पै संगणक ७/१२ प्रमाणे १७९/३/१ | ०.०१.१५ |
| | | | | ३०२/२पै संगणक ७/१२ प्रमाणे ३०२/२ | ०.००.८१ |
| | | | | १७६ पै संगणक ७/१२ प्रमाणे १७६/५/६ | ०.०२.७५ |
| **एकूण** | | | | | **०.०५८३** |

## अनुसुची २

## सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण

| **प्रकल्पाचे नाव :** | **डीएफसीसी रेल्वे उड्डाणपुल** |
|---|---|
| प्रकल्पाचे वर्णन : | डहाणू तालुक्याच्या हद्दीत मौजे-घोलवड येथील एकूण संपादन क्षेत्र ०.०५८३ चौ.मी.चा प्रकल्प आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ : | रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराचा संधी मिळतील. |

## अनुसूची तीन

## बांधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

१. प्रकल्पाचे बांधकाम

२. प्रकल्पाचे परिचालन

३. प्रकल्पाची देखभाल.

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता आहे.

## अनुसूची चार

## (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन निर्णय क्रमांक पिएलएन-२०१६/सीआर-(६०२)/नि-३.—मंत्रालय, मुंबई ४०००३२ नुसार पालघर, जिल्हा डहाणू तालुक्यातील पश्चिम रेल्वे वरील रेल्वे फाटक रेल्वे लेव्हल क्रासिंग क्र.६१ कि.मी. १७४/९५५-५७० वर बोर्डी तलासरी रस्ता प्र.जि.मा-३ कि.मी.२/२००. वरील लेव्हल क्रॉसिंग क्र.६४ च्या ठिकाणी घोलवड, उंबरगाव दरम्यान रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करणेकरिता भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) या मध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसुचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक ३०, दिनांक ३०/०१/२०२३ नुसार उक्त प्रकल्पाला जनहिताच्या दृष्टीने लोक हितकारि प्रकल्प असल्याकारणे, प्रकरण दोन आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागु करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची-पाच
## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासन म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू |
| ब. | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | डहाणू आगरोड, कॉटेज हॉस्पिटलजवळ आगर-डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर, पिन कोड ४०१ ६०१ |
| क. | ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील (M) | उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) सुर्या प्रकल्प डहाणू यांचेकडील पत्र जा. क्र. भूसंपादन/रेल्वे उड्डाणपुल/कावि-१९०/२०२५, दि. २१/०७/२०२५ अन्वये, उपविभागीय अधिकारी डहाणू यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. |

**विशाल खत्री,**
सक्षम प्राधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी,
डहाणू विभाग, डहाणू.

डहाणू
दिनांक : ३ जुलै २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.